नि. फौ.ख.नं.११८२/२०२२
निशाणी-३९

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३१३ प्रमाणे.
आरोपीचा जबाब.

आरोपी क्र.३ चे नावः- सागर केशव बोरुडे ,

वयः- २४ वर्षे,

व्यवसायः- शिक्षण,

राहणार - सारोळा बद्दी ता. जि. अहमदनगर

प्रश्न १- तुम्हाला सरकारी पक्षाचा साक्षी पुरावा समजला आहे काय ?
उत्तरः- होय.

प्रश्न २- साक्षीदार क्र.१/फिर्यादी नामे गोरख पोपट बोरुडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते तुम्हाला ओळखतात, कैलास बोरुडे हा त्यांचा चुलत भाऊ आहे आणि निखील व सागर हे त्यांचे पुतणे आहेत, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे आहे.

प्रश्न ३- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दिनांक ०२.०७.२०२१ रोजी, दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास ते आणि तुम्ही त्यांच्या घराजी मोजणी करत होते, त्यांच्या घराचा कोपरा आरोपी क्र.१ कैलास यांच्या भावाच्या जागेत येत होता, ते तुम्हाला म्हणाले की, ते त्या बदल्यात तुम्हाला त्याच्या घराच्या समोरील जागा देतो, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ४- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, परंतू त्यावेळेस तुम्ही म्हणाले की, आम्हाला आत्ताच जागा पाहिजे आणि तुम्ही त्यांना मारहाण केली, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ५- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, आरोपी क्र.२ याने गजाने त्यांच्या डोक्यात मारले, आरोपी क्र.१,३ व ४ यांनी त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली, तसेच त्या ठिकाणी त्यांचा मुलगा शंभुनाथ हा आला असता त्याला सुध्दा आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण केली, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ६- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते पोलीस ठाण्यात गेले आणि त्यांनी फिर्याद (निशाणी १३) दाखल केली, त्यावर त्यांची सही आहे, त्यातील मजकुर खरा आणि बरोबर आहे, त्यांनी प्राथमिक माहिती अहवाल (निशाणी १४) दाखल केली, त्यावर त्यांची सही आहे, त्यातील मजकुर खरा

आणि बरोबर आहे, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ७- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दुस-या दिवशी पोलीसांनी घटनास्थळावर येवून पंचनामा केला व गुन्हया वापरलेला गज तेथून जप्त केला तसेच दोन पंचांच्या सहया घेतल्या, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ८- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, पोलिसांनी त्यांना सरकारी दवाखान्यात पाठविले होते, ते तुम्हाला ओळखतात, ज्या गजाने त्यांना मारहाण झली होती तो गज दाखविल्यास ते ओळखू शकतात, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ९- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, ज्या गजाने मारहाण झाली तो गज (आर्टिकल-अ) त्यांनी ओळखला, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १०- साक्षीदार क्र.२ नामे शंभुनाथ गोरख बोरुडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते तुम्हाला ओळखतात, तुम्ही त्यांचे चुलते व चुलत भाउ आहात, दिनांक ०२/०७/२०२१ रोजी, दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घराच्या समोर तुमची आणि त्यांच्या शेतजमिनीची खाजगी मोजणी आणली, त्यांच्या घराचा कोपरा तुमच्या हद्दीत येत होता, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ११- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्याचे वडील गोरख तुम्हाला म्हणाले की, तुम्ही सरकारी मोजणी आणा जर त्यांच्या घराचा हिस्सा तुमच्याकडे निघाला तर आम्ही देवू परंतू आता देणार नाही, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १२- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, आरोपी क्र.२ व ४ तेथे येवून, त्यांनी त्या ठिकाणी पडलेला एक गजाचा तुकडा घेवून आरोपी क्र.२ याने त्याच्या वडीलांच्या डोक्यात तो गज मारला, तसेच आरोपी क्र.१, २ व ४ यांनी त्याच्या वडीलांना लाथाबुक्यानी मारहाण करीत असताना ते तेथे आले, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १३- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, परंतू तुम्ही त्यांना सुध्दा लाथाबुक्यांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली, त्यानंतर त्यांच्या

वडीलांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १४- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला होता, गज (आर्टिकल-अ) त्यांनी ओळखला, ते तुम्हाला ओळखतात, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १५- साक्षीदार क्र.३ नामे संगिता बोरुडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्या तुम्हाला ओळखतात, तुम्ही त्यांच्या शेजारी राहतात, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १६- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घटनेच्या वेळेस त्या त्यांच्या शेतात काम करीत होत्या, त्यावेळेस त्यांचे सोबत त्यांची सुन जया ही सुध्दा होती, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १७- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घरी आल्यावर त्यांना कळाले की, आरोपी क्र.२ याने त्याचे पती गोरख यांना डोक्यात गज मारला, त्यांचे पती यांना दवाखान्यात वेनू भरती करण्यात आले होते, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १८- साक्षीदार क्र.४ नामे जया बोरुडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्या तुम्हाला ओळखतात, तुम्ही त्यांच्या शेजारी राहतात, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न १९- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घटनेच्या वेळेस त्या त्यांच्या शेतात काम करीत होत्या, त्यावेळेस त्यांचे सोबत त्यांची सासू संगिता बोरुडे ही सुध्दा होती, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न २०- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घरी आल्यावर त्यांना कळाले की, तुम्ही त्यांच्या सास-यांना मारहाण केली व आरोपी क्र.२ ने त्यांच्या सास-याना गजाने मारले, सदरील भांडण जागेच्या कारणावरुन झाले होते, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न २१- साक्षीदार क्र.६ नामे लिंबराज डोंगरे यांच्या साक्षीत असे आले आहे

की, दिनांक ०३.०७.२०२१ रोजी, पोलीसांनी त्यांना सारोळाबद्दी गावात फिर्यादी गोरख पोपट बोरुडे यांच्या घराजवळ घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न २२- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्याठिकाणी त्यांच्या सोबत दुसरे पंच चेतन लांडगे हे देखील हजर होते, घटनास्थळ त्यांना फिर्यादीचे वडील पोपट बोरुडे यांनी दाखविले, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न २३- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्याठिकाणी पोलीसांनी त्यांच्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा (निशाणी २९) तयार केला होता, त्यावर त्यांची सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न २४- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, गज (आर्टिकल-अ) त्यांनी ओळखला, त्यावर लावलेल्या कागदी लेबलवर त्यांची सही आहे, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न २५- साक्षीदार क्र.७ नामे डॉ. गजानन वंगाळ यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक ०२.०७.२०२१ रोजी, ते सिव्हील हॉस्पीटल येथे रात्री ९.०० ते सकाळी ९.०० वाजे दरम्यान डयुटीवर असतांना, त्या दिवशी रात्री १०.३० वाजता, गोरख पोपट बोरुडे हॉस्पीटलमध्ये आले होते, त्यांनी त्यांना तपासले होते, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- मला माहित नाही.

प्रश्न २६- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सुरेशने त्याला मारहाण झाल्याचे त्यांना सांगितले होते, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- मला माहित नाही.

प्रश्न २७- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांना गोरख बोरुडे यांच्या शरिरावर निशाणी ३२ मध्ये नमुद केलेल्या जखमा आढळुन आल्या होत्या, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न २८- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, गज (आर्टिकल-अ) त्यांनी दाखविला, त्यांनी सदर जखमा गजाने होवू शकतात असे सांगितले, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- मला माहित नाही.

प्रश्न २९- साक्षीदार क्र.८ नामे सचिन वनवे यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक ०२.०७.२०२१ रोजी, ते नगर तालुका पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होते, वरिष्ठांच्या आदेशानुसार गु.र.नं.३६४/२०२१ चा तपास आदेश (निशाणी ३५) नुसार सोपविण्यात आला होता, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ३०- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी घटनास्थळावर जावुन दोन पंचासमक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनामा (निशाणी २९) तयार केला, त्यावर त्यांची आणि पंचाची सही आहे, त्यातील मजकुर खरा आणि बरोबर आहे, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ३१- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी मुद्देमाल पावती (निशाणी ३६) तयार केला, त्यावर त्यांची सही आहे, त्यातील मजकुर खरा आणि बरोबर आहे, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ३२- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, जखमीचे वैदयकिय प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे प्राप्त केली, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ३३- त्यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांच्या तपासात आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने त्यांनी त्यांच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले, ते तुम्हाला ओळखतात, या बाबत आपणास काय म्हणावयाचे आहे ?
उत्तरः- हे म्हणणे खरे नाही.

प्रश्न ३४- सरकारी पक्षाचे साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देतात ?
उत्तरः- माहीत नाही.

प्रश्न ३५- तुम्हाला शपथेवर साक्ष द्यायची आहे का ?
उत्तरः- नाही.

प्रश्न ३६- तुम्हाला तुमच्या बचावासाठी तुमचे साक्षीदार तपासायचे आहेत काय?
उत्तरः- नाही.

प्रश्न ३७- या खटल्याबद्दल आणखी काय सांगायचे आहे का ?
उत्तरः- प्रस्तुत खटल्यात आम्हाला खोटया पध्दतीने गोवन्यात आले आहे.

नि. फौ.ख.नं.११८२/२०२२
निशाणी-३९

दिनांकः-२१/०१/२०२६ समक्ष

SACHIN SHIVAJIRAO UBALE Digitally signed by SACHIN SHIVAJIRAO UBALE Date: 2026.01.21 16:28:22 +0530

(एस.एस. उबाळे)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर.

-----------
आरोपीची स्वाक्षरी,

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ३१३ नुसार समज देण्यात आली. सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या वकिलांना कलम ३१३ (५) नुसार साक्षी पुराव्यावरुन तयार करण्यात आलेले प्रश्न दाखविण्यात आले व त्यात त्यांना आणखी काही प्रश्न विचारायचे नाहीत असे कथन केले. आरोपीस प्रस्तुत खटल्यातील साक्षीपुराव्यावरुन प्रश्न विचारण्यात आले. आरोपीने सांगितलेल्या उत्तराप्रमाणे ते त्याच्या शब्दात लिहून घेण्यात आलेले आहेत.

दिनांकः- २१/०१/२०२६ समक्ष

SACHIN SHIVAJIRAO UBALE Digitally signed by SACHIN SHIVAJIRAO UBALE Date: 2026.01.21 16:28:27 +0530

(एस.एस. उबाळे)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर.